**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १८६ । शनिवार ११ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# पे अँड पार्क योजना राबविणे अव्यवहार्य व नियोजनशून्य!

## एमजी रोडवरील पे अँड पार्कला व्यापारी संघटनेचा विरोध । आंदोलनाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर महापालिकेतर्फे शहरातील १२ रस्त्यांवर पे अँड पार्क तसेच १२ रस्त्यांवर नो पार्किंग योजना प्रस्तावित करण्यात आलेली असून, त्यामध्ये कापडबाजार एमजी रोड या अत्यंत महत्त्वाच्या व्यापारी भागाचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु ही योजना राबविणे अव्यवहार्य व नियोजनशून्य असून, त्यामुळे व्यापारी–ग्राहकांची मोठी गैरसोय होण्याबरोबरच व्यापारी पेठेला फटका बसणार असल्याची भूमिका मांडून एमजी रोड व्यापारी संघटनेने मांडली असून, या प्रस्तावित योजनेच्या विरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

यासंदर्भात कापड बाजार व्यापारी संघटनेने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, एमजी रोडवरील रस्ते रुंदीकरणासाठी आम्ही व्यापा–यांनी दोन्ही बाजूंनी सुमारे ७ ते ८ फूट जागा कोणतीही नुकसानभरपाई न घेता स्वखर्चाने इमारती तोडून व पुनर्बांधणी करून दिली आहे. यासंदर्भात शासन व महानगरपालिका यांच्यात तडजोड डिक्री झाली आहे. अशा परिस्थितीत येथे पे अँड पार्क लागू करणे हे न्यायालयाचा अवमान ठरू शकते.

कापड बाजारात अनेक किरकोळ दुकाने असून येथे पाच रुपयांपासून वस्तू विकल्या ■ पान ४ वर

### मागणीला पाठिंबा देण्याचे नगरसेवक, नगरकरांना आवाहन

**नगर शहरातील सर्व नागरिक व नव्याने निवडून आलेले नगरसेवक यांनी व्यापारी संघटनेच्या न्याय्य मागणीस पाठिंबा देऊन एमजी रोडवरील हा अन्यायकारक कर पे अंड पार्क) तात्काळ रद्द करण्यात सहकार्य करावे. वरील सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून एमजी रोड कापड बाजार हा भाग पे अँड पार्क योजनेतून तात्काळ वगळण्यात यावा व या विषयावर व्यापारी संघटनांशी प्रत्यक्ष चर्चा करूनच अंतिम निर्णय घेण्यात यावा, अशीही मागणी व्यापारी संघटनेने केली आहे.**

### सर्वसामान्यांवर पडणार आर्थिक भार, इतर शहरांमध्ये असा प्रकार कोठेच नाही

**पे अँड पार्कमुळे सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. वाहन टोईंग केल्यास दुचाकीसाठी सुमारे १५९० + जीएसटी व चारचाकीसाठी १९८४ + जीएसटी इतका खर्च नागरिकांना सहन करावा लागणार आहे, जो अत्यंत अन्यायकारक आहे. शासनाकडून आधीच रस्ता कर आकारला जात असताना त्याच रस्त्यावर अतिरिक्त पे अँड पार्क शुल्क आकारणे हे अन्यायकारक व बेकायदेशीर आहे. असा प्रकार इतर शहरांमध्ये जसे सोलापूर, बारामती, कोल्हापूर तसेच पुणे शहरात (लष्करी कॅन्टोन्मेंट क्षेत्र वगळता) आढळत नाही. महानगरपालिकेने स्वतंत्र पार्किंग स्थळे उभारल्यास तेथे शुल्क आकारण्याचा अधिकार असू शकतो; मात्र सार्वजनिक रस्त्यावर अशा प्रकारे शुल्क आकारणे योग्य नाही.**

### खासगी कंत्राटदाराला पत्र देणे ही कृती बेकायदेशीर व पक्षपाती

**महापालिकेने हरकती व सूचना मागविण्यापूर्वीच खासगी कंत्राटदारास पत्र देऊन प्रक्रिया सुरु केली आहे. ही कृती पक्षपाती व पूर्णतः बेकायदेशीर असून नैसर्गिक न्यायाच्या तत्वांना बाधा आणणारी आहे. आजपर्यंत महापालिकेने शहरात कुठेही व्यवस्थित पार्किंगची सोय निर्माण केलेली नाही. अचानक पे अँड पार्क योजना राबविणे हे अव्यवहार्य व नियोजनशून्य आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर फेरीवाले असून गेल्या ५० वर्षांत त्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन किंवा हटविणे झालेले नाही. एमजी रोड हा शासन निर्णयानुसार नो हॉकर झोन आहे, तरीही त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली नाही. या योजनेत चारचाकी वाहनांच्या पार्किंगचाही समावेश करण्यात आलेला आहे. खासगी कंत्राटदार नफ्यासाठी रस्त्यावर चारचाकी वाहने उभी करून संपूर्ण रस्ता अडविण्याची शक्यता आहे, ज्यामुळे वाहतूक कोंडी वाढेल, असे व्यापा–यांचे म्हणणे आहे.**

# शहरातील दोन टोळ्यांवर कलम १११ ची कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहर उपविभागातील संघटित गुन्हे करणा–या २ टोळ्यांवर भारतीय न्याय संहिता कलम १११ प्रमाणे कारवाई करण्यात आली.

कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी संतोष चंद्रसेन गायकवाड (रा. केडगांव देवी रोड, केडगांव) यांच्या फिर्यादीवरुन कोतवालीत बीएनएस २०२३ चे कलम ३१८ (४), ३१६ (२), ३ (५) अन्वये लुकमान सुलेमान मदारी व अल्ताफ हुसेन मदारी (दोघे रा. मदारी मोहल्ला, ता.शिरुर जि. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयातील टोळीप्रमुख लुकमान सुलेमान मदारी व त्याच्या टोळीतील साथीदार हे जामिनावर सुटल्यावर प्रचलित कायदयानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील गुन्हे करणे चालू राहिल्याने त्यांच्याविरुध्द दि. १० एप्रिल रोजी बीएनएस. कलम २०२३ चे कलम १११ हे वाढीव कलम लावण्यात आलेले आहे.

तसेच तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी यश मनोज कांडेकर (रा. सिव्हील हाडको, गणेश चौक, नगर) यांच्या फिर्यादीवरुन तोफखान्यात बीएनएस २०२३ चे कलम ३०८ (२). ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ११९ (१), ३२४ (२), ३ (५) सह आर्म अॅक्ट ४/२५ अन्वये अमोल बाळू पाडळे, नयन राजेंद्र तांदळे, तुषार अशोक भोसले व अक्षय सुभाष पवार (सर्व रा. नीलक्रांती चौक, नगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयातील ■ पान ४ वर

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

## जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण; विचारांमधून समाजाला प्रेरणा – आ. संग्राम जगताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी महात्मा फुले यांच्या नावाचा जयघोष करत कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाची पहिली शाळा सुरू करून शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळे आज महिला सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर असून देशाच्या प्रगतीमध्ये त्यांचा मोठा वाटा आहे.



महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सव सुरू करून छत्रपतींचा इतिहास समाजासमोर आणण्याचे कार्य केले. तसेच शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आपल्या लेखणीतून मांडून समाजजागृती केली.

त्यांचे विचार आजच्या युवा पिढीसाठी प्रेरणादायी असून समाजाला योग्य दिशा देणारे आहेत. ■ पान ४ वर

# विधानपरिषद सभापती मा. प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकाराने कर्जत–जामखेड मध्ये डिजिटल शैक्षणिक क्रांती

## मुख्यमंत्री महोदयांच्या ऑनलाईन सहभागासह १३ एप्रिल, २०२६ रोजी इंटरॲक्टिव्ह पॅनल आणि शैक्षणिक साहित्य लोकार्पण सोहळा । एकूण ३४३ जिल्हापरिषद शाळांना ९ कोटी ६४ लाख २७ हजार रुपये खर्चाचे डिजिटल साहित्य

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**मुंबई/ अहिल्यानगर–** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार हे उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या स्थानिक विकासनिधीतून कर्जत आणि जामखेड तालुक्यातील जिल्हापरिषद शाळांमध्ये डिजिटल शिक्षण सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. सोमवार, दिनांक १३ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता या अभियानाअंतर्गत १४० शाळांमध्ये ६५ इंची इंटरऍक्टिव्ह पॅनल, ई-लर्निंग सॉफ्टवेअर, वायरलेस कीबोर्ड व माऊस आणि ऑफलाइन यूपीएस असे शैक्षणिक साहित्य लोकार्पणाचा सोहळा आयोजित करण्यात आला असून मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस दूरदृष्यप्रणालीद्वारे यावेळी उपस्थित राहणार आहेत.



एकूण ९ कोटी ६४ लाख २७ हजार रुपये इतक्या निधीचे डिजिटल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात एकूण शाळांची संख्या २६६ असून सन २०२२-२०२३ मध्ये ४१, सन २०२४-२०२५ मध्ये १०० आणि सन २०२५-२०२६ मध्ये ८४ अशा एकूण २२५ शाळा तर जामखेड तालुक्यात एकूण शाळांची संख्या १७३ असून तेथे सन २०२२-२०२३ मध्ये ३०, सन २०२४-२०२५ मध्ये २८ आणि सन २०२५-२०२६ मध्ये ५६ अशा एकूण ११४ शाळांमध्ये आणि अहिल्यानगरमध्ये ०४ याप्रमाणे एकूण ३४३ शाळांमध्ये डिजिटल शैक्षणिक संच वाटप करण्यात येत आहे.

या सोहळ्यास मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. श्री. जयकुमार गोरे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव श्री. एकनाथ डवले, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. वेणुगोपाल रेड्डी, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अहिल्यानगर जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंद भंडारी तसेच शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थीवर्ग, पालक, ■ पान ४ वर

**सालसिल बाबा यात्रे निमित्त येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत**
यात्रेनिमित्त हार्दिक शुभेच्छा



श्री. सतिष खेडकर
**हॉटेल विश्वजोत फॅमीली रेस्टारंट, मिडसांगवी**

# थोर समाज सुधारक फुलेंच्या स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे – किरण काळे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दांपत्याने देशामध्ये शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. या सगळ्याचा ऐतिहासिक संदर्भ अहिल्यानगर शहराशी जोडला गेलेला आहे. मात्र गेल्या अनेक दशकांपासून शहरांमध्ये फुलेंच भव्य दिव्य स्मारक उभ राहू शकल नाही ही खंत आहे. स्मारक उभारण्याच काम अहिल्यानगर महानगरपालिकेने लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीवाडा येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काळे बोलत होते. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, रावजी नांगरे, दीपक भोसले, संजय गारुडकर सर, राम वाणी, राम झिने, अलतमश जरीवाला, रोहन शेलार, चंद्रकांत उजागरे, संतोष घरवाढवे, मतीन शेख, उषाताई भगत, शैलाताई लांडे, शंकर आव्हाड, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, गणेश आपरे, अमोल खाडे, रामभाऊ धोत्रे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

काळे म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील रूढी, परंपरा यांना छेद देत समाजामध्ये बदल रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना मोठ्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये महात्मा फुले यांनी केलेले क्रांतिकारी कामामुळे समाजाची दिशा बदलून गेली. महात्मा ज्योतिबा फुले यांना ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### ‘यादों की बारात - संगीत के सितारे’ भव्य लाइव्ह कॉन्सर्ट

अहिल्यानगर- शहरातील संगीतप्रेमींसाठी एक खास मेजवानी ठरणारा भव्य खुल्या मैदानातील लाइव्ह म्युझिकल कॉन्सर्ट ‘यादों की बारात-संगीत के सितारे’ याचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. दमन काशिद हॉस्पिटल यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम प्रथमच अहिल्यानगरमध्ये होत असून, तो शहरातील आतापर्यंतचा सर्वात मोठा ओपन ग्राउंड म्युझिकल कॉन्सर्ट ठरणार आहे.हा बहुप्रतीक्षित कार्यक्रम रविवारी, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते रात्री ९.३० या वेळेत के.पी.लॉन्स, कराळे हेल्थ क्लब रोड, परिचय हॉटेलच्या मागे, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात पुणे आणि मुंबई येथील २५ हून अधिक नामांकित संगीतकार सहभागी होणार असून, १० व्हायोलिन वादकांचा विशेष संचही या कार्यक्रमाचे आकर्षण ठरणार आहे. सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय गायक वाजिद खान (मुंबई) यांच्या दिग्दर्शनाखाली हा कार्यक्रम सादर केला जाणार आहे.कार्यक्रमात डॉ. गायत्री कुलकर्णी, डॉ. दमन काशिद, प्रणाली धर्माधिकारी (आरजे) यांसारखे कलाकारही आपल्या सुरांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. कार्यक्रमाचे संकल्पना व आयोजन डॉ. दमन काशिद यांनी केले असून, संगीत संयोजन अमन सय्यद (पुणे) यांच्याकडून करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता जोगळेकर करणार आहेत. विशेष म्हणजे, या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून, प्रेक्षकांना पास आवश्यक राहणार आहेत. पाससाठी इच्छुकांनी ज्ञानेश्वर माने,महेश घावटे यांच्याशी किंवा ८९५६३६३६६८/७३५०८८१५१५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.अहिल्यानगरकरांनी या संगीतमय पर्वाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### सिद्धार्थनगरातील रहिवाशांची पोलीस अधीक्षकांकडे धाव



अहिल्यानगर- सिद्धार्थ नगर, म्युनिसिपल कॉलनी येथील रहिवाशांनी गंभीर मारहाणीच्या घटनेप्रकरणी पोलीस अधीक्षकांची भेट घेत संबंधित आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात सुनिता भीवसेन घोरपडे यांनी निवेदन सादर केले.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, १४ मार्च २०२६ रोजी शेजारील व्यक्तींशी किरकोळ वाद झाल्यानंतर तोफखाना पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी (१५ मार्च) घोरपडे कुटुंबीय माहिती घेऊन परतत असताना काही आरोपींनी त्यांना समझोत्याच्या बहाण्याने झेडपी कॉलनी येथील पाण्याच्या टाकीजवळ बोलावले.तेथे विजय पठारे, अजय पठारे, किरण जोदिया, सनी चावरे आणि निलेश ससाणे यांनी एकत्र येत घोरपडे यांचा मुलगा अविनाश याच्यावर तलवार, कोयता, लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात अविनाश गंभीर जखमी झाला असून त्याचे दोन्ही पाय व एक हात मोडला आहे. वडील भीमसेन घोरपडे यांनी मध्ये पडण्याचा प्रयत्न केल्यावर त्यांनाही मारहाण करण्यात आली.जखमी अवस्थेत अविनाश याला तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून पुढील उपचार सुरू आहेत. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तक्रारीत पुढे म्हटले आहे की, संबंधित आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्या विरोधात यापूर्वीही गंभीर गुन्हे नोंद आहेत. तसेच घटनेनंतर मागील २३ दिवसांपासून आरोपी फरार असून ते कुटुंबीय व साक्षीदारांना धमक्या देत आहेत. आरोपींच्या नातेवाईकांकडूनही तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.पोलीस अधीक्षकांना निवेदन देताना सुनिता घोरपडे, भीमसेन घोरपडे, पोपटराव पठारे, पांडुरंग घोरपडे, श्यामवेल पटेकर यांच्यासह सिद्धार्थ नगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रत्येक नागरिकाला न्याय देणे, हीच खरी लोकशाहीची ताकद - आ. काशिनाथ दाते सर

**महाराजस्व समाधान शिबिर | लोकहिताचे प्रभावी व्यासपीठ**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित ‘‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’’ पळवे खु. मंडळातील वडनेर हवेली, ता. पारनेर येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले असून, विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना प्रत्यक्ष ठिकाणीच देण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार काशिनाथ दाते म्हणाले, ‘‘महसूल विभाग हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित असून प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी अशा शिबिरांची गरज आहे. तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश समस्या या रस्ते व जमीन विभाजनाशी संबंधित असतात. ‘बळीराजा शेतपानंद रस्ते योजना’ प्रभावीपणे राबवून या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा शासनाचा प्रयत्न सातत्याने सुरुच आहे. आज राज्य, देश आणि जग झपाट्याने प्रगती करत असताना प्रशासनही तितक्याच वेगाने नागरिकांच्या सेवेत उभे राहिले पाहिजे. शासन व जनतेमधील दरी कमी करून प्रत्येक नागरिकाला न्याय देणे, हीच खरी लोकशाहीची ताकद आहे.’’

यासोबतच त्यांनी ग्रामपंचायतींच्या सक्षमीकरणासोबत नागरिकांच्या होत असलेल्या धावपळीवर व त्यातून त्यांना सामोरे जावे लागत असलेल्या मानस्तापावर उपाय योजना राबविणे गरजेचे असल्याचे सांगताना स्पष्ट केले की, ‘‘प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालय सुसज्ज करून तेथेच डाटा एंट्री ऑपरेटरांना प्रोत्साहन दिल्यास, विविध दाखल्यांसाठी तालुक्याच्या ठिकाणी नागरिकांना करावी लागत असणारी धावपळ मोठ्या प्रमाणात कमी होईल. प्रशासन गावपातळीवर सक्षम होणे ही काळाची गरज असून उद्याच्या काळात त्यादृष्टीने विचार होणे गरज आहे ‘‘आजवर अशा शिबिरांत प्रामुख्याने सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनाच निमंत्रण दिले जाते, असे प्रकर्षाने

> **शासनाचे धोरण हे कार्यक्रमांपुरतीच मर्यादित न राहता ती सर्वसामान्यांना आपली वाटली पाहिजे, आपल्यासाठीच शासन वेगवेगळी धोरण राबवतंय हा विश्वास प्रत्येकाच्या मनात जागला पाहिजे. अत्यंत कर्तव्यदक्षपणे व जागरुकतेने आमदार दाते सर संपूर्ण मतदारसंघात काम करत असल्याचा अभिमान असून तालुक्याच्या तहसीलदारांसह सर्वच आयोजकांनी हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल विशेष आभार मानतो.**
>
> **विक्रम कळमकर**
> **(तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस)**

जाणवले असून यापुढे या शिबिरांमध्ये सर्वपक्षीय माजी सरपंच, माजी पंचायत समिती सदस्य, माजी जिल्हा परिषद सदस्य अशा सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांना सहभागी करून घेतल्यास शासनाचा मूळ उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य होईल.’’

कृषी विभागाच्या कामगिरीचे विशेष कौतुक करताना आमदार दाते सर म्हणाले, ‘‘कृषी विभागाने आठशेहून अधिक शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी अनुदान दिले असून, त्यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असल्याचा आनंद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर जाणवतो आहे. इतर विभागांच्या तुलनेत सर्वाधिक अनुदान वितरित करून शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेले कृषी विभागाचे कार्य कौतुकास्पद आहे.’’

कार्यक्रमास तहसीलदार गायत्री सौंदाणे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, कृषी अधिकारी गजानन घुले, नायब तहसीलदार दिपक कारखिले, सरपंच लहु भालेकर, युवती कार्याध्यक्ष सोनाली कुलथे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबर इंडस्ट्रीजमध्ये ५५ विद्यार्थ्यांची निवड; ढाकणे इंजिनिअरिंग कॉलेजचे उल्लेखनीय यश




दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**शेवगाव–** ढाकणे शैक्षणिक संकुल अंतर्गत कार्यरत समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या तृतीय वर्ष मॅकेनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा विभागासाठी आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये . (अंबर इंडस्ट्रीज) या नामांकित कंपनीत एकूण ५५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. ही प्लेसमेंट प्रक्रिया अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत व वैयक्तिक मुलाखत अशा विविध टप्प्यांमधून निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञान, आत्मविश्वास आणि संवाद कौशल्यांच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी करत हे यश संपादन केले.

महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करता आली. मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, तांत्रिक कार्यशाळा व सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण यांचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला. प्लेसमेंट सेलच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या प्लेसमेंट प्रक्रियेवेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथराव ढाकणे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर महेश मरकड, उप प्राचार्य प्रा. प्रवीण नागरगोजे, विभागप्रमुख विश्वास घुटे, प्रा. कृष्णा ढाकणे, प्रा. बाळासाहेब शिरसाट, प्रा. किशोर बटुळे, प्रा. सचिन म्हस्के, प्रा. आकाश डमरे आदी उपस्थित होते. तसेच कंपनीकडून रूपेश वाघ, सुमित फुके, अशोक गाडीलकर, अनिल मोरे हे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक करत उद्योग क्षेत्रातील संधी व अपेक्षा याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथराव ढाकणे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ‘‘ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण व मार्गदर्शन दिल्यास तेही उद्योग क्षेत्रात यश मिळवू शकतात.’’ संस्थेच्या वतीने निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# रिक्षाचालकाच्या लेकीची पोलिस दलात भरारी; आखतवाडा गावच्या डोळ्यांत आनंदाश्रू

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**पैठण–** तालुक्यातील आखतवाडागाव येथील एका साध्या रिक्षाचालकाची मुलगी सुरैया अकबर शेख हिने जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर पोलिस दलात स्थान मिळवत केवळ आपल्या कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण गावाचा अभिमान वाढवला आहे.

सुरैयाच्या या यशाची बातमी गावात पोहोचताच आनंदाचे वातावरण पसरले. अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. गावकऱ्यांनी पेढे वाटत जल्लोष साजरा केला. ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढत लेकीचा सन्मान करण्यात आला. काहींनी तिला खांद्यावर उचलून गावभर फिरवत तिच्या यशाचा अभिमान व्यक्त केला.

गरिबी आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ‘‘आपल्या गावातील मुलगी पोलिस झाली’’ या भावनेने गावकऱ्यांच्या आनंदाला अक्षरशः उधाण आले होते. या निमित्ताने आखतवाडागावात जणू दिवाळीच साजरी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सुरैयाच्या कुटुंबीयांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा दिल्या जात आहेत. संध्याकाळी काढलेल्या मिरवणुकीत सरपंच मोहन म्हस्के, उपसरपंच विवेक पाटील म्हस्के ,माजी सरपंच अंकुश म्हस्के, राम म्हस्के, बाबू म्हस्के, महेंद्र मोटकर, सीताराम म्हस्के, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधाकर म्हस्के, इब्राहिम शेख, कालू शेख,माजी उपसरपंच नयीम शेख , हासन शेख, संदेश फसाटे, दत्ता फसाटे, कल्याण म्हस्के, अशोक जिंजा, किशोर शिंदे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेमराज सारडा महाविद्यालयात अकरावी ऑनलाइन प्रवेश फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयामध्ये इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे अशी माहिती कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉक्टर पारस कोठारी यांनी दिली.

ज्यांनी दहावीची परीक्षा दिलेली आहे अशा विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेण्यासाठी गतवर्षीपासून पूर्णपणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवायला सुरुवात झालेली आहे. गतवर्षी विद्यार्थ्यांचा मोठा गोंधळ उडाल्याने अनेक विद्यार्थ्यांना त्याचा त्रास झाला. आणि पालकांना आर्थिक झळ बसली होती. यामुळेच या वेळेला शासनाकडून ही प्रक्रिया लवकर सुरू करण्यात आलेली आहे. असे असले तरीही विद्यार्थ्यांना या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये अनंत अडचणी येतात त्यांच्याकडून चुका होतात, आणि चुकीचे फॉर्म भरल्यामुळे पुढे प्रवेशासही अडचण निर्माण होते या सगळ्या गोष्टी टाळण्यासाठी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने पुढाकार घेऊन सर्व विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे अशी माहिती प्राचार्य डॉक्टर माहेश्वरी गावित यांनी दिली आहे.

या ऑनलाइन प्रवेशामध्ये सुरुवातीला विद्यार्थ्यांचा पार्ट १ भरावयाचा असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी पेमराज सारडा महाविद्यालय येथे सकाळी ११ ते ३ या वेळेत उपस्थित रहावे तसेच अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री गिरीश पाखरे यांनी केले आहे. ९७६७७ १७२७२, ७२७६७९४००८, ९९६०६०९७३८

# शिवसेना जनतेशी जोडला गेलेला पक्ष – रामजी रेपाळे

**शिवसेनेचे संपर्कप्रमुख रामजी रेपाळे यांचा युवकांशी संवाद | मंगलगेट येथे स्वागत**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामजी रेपाळे यांनी माजी नगरसेवक सचिन जाधव यांच्या संपर्क कार्यालयास भेट देत युवा कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला. यावेळी शहरात पुन्हा प्रभावीपणे शिवसेनेचे संघटन उभे करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्रिय राहण्याच्या सूचना दिल्या.

मंगलगेट परिसरात सचिन जाधव यांच्या नेतृत्वाखाली रेपाळे यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख संभाजी कदम, संग्राम कोतकर, आशिष शिंदे, भूषण गुंड, किशोर बेद्रे, बंटी बेद्रे, नितीन सुरसे, मयूर कराळे, रोहित पाथरकर, विशाल गायकवाड, विनोद शिरसाठ, सचिन सापते, अक्षय भिंगारे, रावसाहेब जाधव, विशाल सिद्ध, अभिजीत अष्टेकर, अक्षय कोंडावार, विजय जाधव, सतीश काळे यांच्यासह मोठ्या संख्येने युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

रामजी रेपाळे म्हणाले की, शिवसेना ही केवळ एक राजकीय पक्ष नाही, तर ती सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारी चळवळ आहे. गेल्या काही वर्षांत अनेक आव्हाने आली, बदल झाले; मात्र शिवसेनेचा मूलभूत विचार कधीच बदललेला नाही. आज गरज आहे ती संघटन पुन्हा मजबूत करण्याची आणि प्रत्येक कार्यकर्त्याने लोकांपर्यंत पोहोचण्याची. शिवसेना जनतेशी जोडला गेलेला पक्ष असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना सर्वसामान्यांसाठी काम करत आहे, आणि हे कार्य अधिक प्रभावी करण्याची जबाबदारी तुमच्या-आमच्या सर्वांवर असल्याचे ते म्हणाले.

सचिन जाधव म्हणाले की, ‘‘युवा वर्ग मोठ्या प्रमाणात शिवसेनेकडे आकर्षित होत आहे. कारण शिवसेना ही युवांच्या भावना समजून घेणारी आणि त्यांना संधी देणारी संघटना आहे.

# महापुरुषांच्या विचाराने फिनिक्सचे कार्य – नेताजी भाबड

**नागरदेवळे येथे ज्येष्ठांची नेत्र तपासणी; ५७ रुग्णांवर होणार मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया | नेत्रदान व अवयवदानाची जागृती**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सप्ताहानिमित्त नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नेत्रदान व अवयवदानाची जागृती करुन ज्येष्ठांची विविध आरोग्य तपासणी देखील करण्यात आली.



महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी फिनिक्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड, कामगार तलाठी आदिनाथ निकम, धनराज गांधी, डॉ. विशाल घंगाळे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड म्हणाले की, नेत्रदान व अवयवदान चळवळ गतीमान होण्यासाठी फिनिक्सचे योगदान सुरु आहे. महापुरुषांनी तत्कालीन सामाजिक प्रश्न व वंचित घटकांसाठी कार्य केले. त्यांचा आदर्श ठेऊन काळाची गरज बनलेल्या आरोग्य प्रश्नावर फिनिक्सचे कार्य दिशादर्शक असून, या शिबिराच्या माध्यमातून गावाचे नाव देश पातळीवर पोहचले असल्याचे त्यांनी सांगितले.

कामगार तलाठी आदिनाथ निकम म्हणाले की, फिनिक्सच्या माध्यमातून अनेक दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळाली आहे. अंधकारमय जीवन बनलेल्या सर्वसामान्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य फिनिक्स फाऊंडेशन करत असल्याचे त्यांनी सांगितले.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, फिनिक्स फाऊंडेशनने अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आनले असून, एका व्यक्तीच्या नेत्रदानाने दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होतो. डोळे कृत्रिमरित्या तयार होत नसून, मरणोत्तर नेत्रदान झाल्यानेच अंधाचे जीवन प्रकाशमान होणार असल्याचे सांगून त्यांनी महापुरुषांच्या विचाराने फिनिक्सच्या माध्यमातून कार्य सुरु असल्याचे सांगितले.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमध्ये ४०९ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. ५७ रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटल मध्ये मोतीबिंदू, काचबिंदूची मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. यावेळी शिबिरातील गरजूंना अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांचे रक्तदाब, मधुमेह आणि इतर तपासण्या करण्यात आल्या. शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, राजेंद्र बोरुडे, रवी बालटे, ओम बोरुडे यांच्यासह बुधराणी हॉस्पिटलचे सचिन पगार, विशाल भिंगारदिवे, फिनिक्सचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### माळीवाडा येथे शिवसेनेतर्फे महात्मा फुले जयंती साजरी



अहिल्यानगर - क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवसेनेच्या वतीने माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक समतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम, शिवसेना गटनेते दत्तात्रय कावरे, संजय शेंडगे, दिलीप सातपुते, शाम नळकांडे, सुरेखा कदम, मंगल लोखंडे, सुवर्णा जाधव, संतोष गेनपा , संदीप दातरंगे, सचिन शिंदे, नवनाथ कातोरे, परेश लोखंडे, नितीन भुतारे , प्रशांत गायकवाड, नलिनी गायकवाड, गणेश कोल्हे आदी उपस्थित होते.याप्रसंगी संभाजी कदम म्हणाले की, ‘‘महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आज महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला अत्यंत आवश्यक आहेत. समता, बंधुता आणि शिक्षण यांचा पुरस्कार करणाऱ्या फुले यांच्या विचारांची खरी गरज आज अधिक जाणवते.’’ते पुढे म्हणाले, ‘‘महात्मा फुलेंनी त्या काळात समाज परिवर्तनासाठी जे कार्य केले, ते अत्यंत क्रांतिकारी होते. शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांनी समाजाच्या उन्नतीचा मार्ग दाखविला. त्यांच्या महान कार्यामुळेच त्यांना ‘महात्मा’ ही उपाधी लाभली. शिवसेना नेहमीच अशा विचारांना नतमस्तक होऊन कार्य करत आली असून, पुढील काळातही सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवून समाजहिताचे कार्य सुरू ठेवणार आहे.’’कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे समाजात जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान परिसरात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

### श्री संत सावता आश्रम शिक्षण संस्थेच्या वतीने महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



अहिल्यानगर - श्री संत सावता आश्रम शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले विद्या मंदिर व सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेचे चेअरमन बाळासाहेब बोराटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘महात्मा फुले यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित करून समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले. त्यांच्या विचारांचा अंगीकार केल्याशिवाय खरी प्रगती शक्य नाही.’’ त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सामाजिक भान ठेवण्याचे आवाहन केले पुढे बोलताना बोराटे यांनी नमूद केले की, ‘‘समाजात समता आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने फुले यांच्या विचारांची अंमलबजावणी आपल्या दैनंदिन जीवनात केली पाहिजे. आजच्या स्पर्धेच्या युगातही मानवी मूल्ये जपणे हीच खरी प्रगती आहे.’’ त्यांच्या या प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण झाला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सचिव प्रा. सुनील जाधव यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, ‘‘फुले यांचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अन्याय व विषमता दूर करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य प्रत्येकाने आत्मसात करणे गरजेचे आहे.’’ त्यांच्या या विचारांनी कार्यक्रमाची सुरुवात वैचारिक वातावरणात झाली.कार्यक्रमास अशोकराव रसाळ, परेश लोखंडे, नितीन भुतारे, दत्ता बनकर, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक राजीव घोलप, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक राजकुमार शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## तरुणांनी सत्यशोधक विचारांनी समाज परिवर्तनाची मशाल हाती घ्यावी – गणेश राऊत

**सावेडीत महात्मा फुले जयंतीनिमित्त वैचारिक अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सावेडी उपनगरात वंचित बहुजन आघाडी प्रणित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार युवा मंचाच्या वतीने गुलमोहोर रोड चौक येथे वैचारिक अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी सामाजिक समतेचा संदेश देत विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महात्मा फुले यांनी दिलेला समतेचा विचार हा केवळ तत्त्वज्ञान नसून शोषित–वंचितांच्या मुक्तीचा मार्ग आहे. ‘‘आजच्या काळात फुले–शाहू–आंबेडकर यांच्या विचारांना आचरणात आणणे, हाच खरा उत्सव आहे,’’असे ते म्हणाले. समाजातील विषमता दूर करण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

योगेश साठे पुढे म्हणाले की, युवकांनी केवळ कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनासाठी सातत्याने कार्य करावे. शिक्षण, समता आणि बंधुता या मूल्यांचा प्रसार करताना प्रत्येकाने जबाबदारीने पुढे यावे. सावेडी परिसरात वैचारिक चळवळ अधिक बळकट करण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी युवा मंचाच्या वतीने सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. पारंपारिक सण साजरे करण्यापेक्षा समाजात प्रबोधनाची जागृती करणे ही काळाची गरज असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले. ‘‘आम्ही केवळ जयंती साजरी करत नाही, तर अज्ञानाविरुद्ध लढा उभारतो, असा निर्धार युवा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी गणेश राऊत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महात्मा फुलेंनी दिलेली सत्यशोधक वृत्ती ही आजच्या तरुणांसाठी दिशादर्शक ठरते. शिक्षण, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढे येणे अत्यावश्यक आहे. समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि विषमता दूर करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून परिवर्तनाची सुरुवात करावी, असे त्यांनी आवाहन केले.

पुढे बोलताना श्री.राऊत म्हणाले की, फुले–आंबेडकरांच्या विचारांमुळेच वंचित समाजाला स्वतःची ओळख मिळाली. आजही अनेक स्तरांवर विषमता दिसून येते, त्यामुळे या विचारांची गरज अधिक तीव्र झाली आहे. तरुणांनी केवळ सोशल मीडियापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष समाजात उतरून काम करावे, संघटित शक्ती निर्माण करावी आणि सामाजिक न्यायासाठी झटावे,असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप यादव, गोविंद खुराना, सुधीर ठोंबे, ॲड. लक्ष्मीकांत पठारे, प्रतीक साठे, देविदास भालेराव, प्रतीक जाधव, अंकुश माळसमिंदर, समिंदर, किरण चव्हाण, रविराज गायकवाड, ज्ञानेश्वर दळवी, संतोष शेळके साहिल उबले,प्रज्योत शिर्के, संतोष पवार, प्रशांत शिंदे, संदेश रणदिवे, प्रसाद चव्हाण, राजू शिंदे, गुलाब सकट, भरत दिघे, पंकज पवार, आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार युवा मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सावेडी परिसरात या उपक्रमामुळे सामाजिक जागृतीची लाट निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

**सकल माळी समाजाच्या वतीने**

## थोर समाज सुधारक महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** थोर समाज सुधारक महात्मा फुले यांनी सर्व समाजाला शिक्षणाची द्वारे खुली केले आहेत.महात्मा फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली. महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षणाचा वारसा पुढे चालवण्यासाठी प्रेरणा दिली. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शिक्षणाच्या चळवळीमुळेच आज सर्व समाज शिक्षित झाला आहे. तसेच चूल आणि मूल या संकल्पनेतून महिलांना बाहेर पडता आले. त्यामुळेच आज देशाच्या पंतप्रधान, राष्ट्रपती, खासदार,आमदार, सरपंच या सर्वोच्च पदापर्यंत महिला पोहोचले आहेत.महात्मा फुले ही सर्व समाजाचे दैवत आहे. असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे नेप्ती विभाग अध्यक्ष रामदास फुले यांनी केले आहे.

माळीवाडा येथे थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सकल माळी समाजाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप,सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, प्राध्यापक माणिक विधाते, पंडितराव खरपुडे, नेप्ती विभाग अध्यक्ष रामदास फुले, राजेंद्र पडोळे विनोद पुंड मच्छिंद्र बनकर राजेंद्र ताठे, ज्ञानेश्वर रासकर,अनिल इवळे,चंद्रकांत पुंड, आदी उपस्थित होते.

## चित्रकला स्पर्धेतून फुले विचारांचा जागर – डॉ. उद्धव शिंदे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी


**अहिल्यानगर–** महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण, समता आणि समाजसुधारणा यासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेत समाजासाठी कार्य करण्याची गरज आहे.असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी यावेळी केले.

स्नेहबंध तर्फे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून भिंगार येथील स्वा. सैनिक जानकी कवडे प्रशाला येथे महात्मा फुले यांच्या प्रतिमेस स्नेहबंध चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यानिमित्त माध्यमिक गटातील (इयत्ता ६ वी व ७ वी) विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

यावेळी शाळेचे संस्थापक डॉ. रविंद्र कवडे, संचालिका सौ. राज कवडे, विस्तार अधिकारी कापरे साहेब, मुख्याध्यापक नंदकुमार लोणकर, निशांत पानसरे तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सिराज खान व आभार दीपक पंडित यांनी केले.

## नेवाशात ‘काळ्या काचांचा रुबाब’ गुन्हेगारीला देणार आमंत्रण? पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष!





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** नेवासा शहर आणि परिसरात सध्या काळ्या काचा लावलेल्या आलिशान गाड्यांचा वावर कमालीचा वाढला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे कडक निर्बंध असतानाही नियमांची पायमल्ली करत फिरणाऱ्या या वाहनांकडे स्थानिक पोलिसांनी डोळेझाक केली आहे. या काळ्या पडद्यांच्या आड गुन्हेगारी कारवाया फोफावण्याची भीती व्यक्त होत असून, पोलिसांच्या या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे सर्वसामान्यांतून संताप व्यक्त होत आहे.

**गुन्हेगारांचे सुरक्षित कवच**

वाहनांना काळी फिल्म लावणे हा केवळ फॅशनचा भाग राहिलेला नसून, ते आता गुन्हेगारांसाठी सुरक्षित कवच बनले आहे. काळ्या काचांमुळे गाडीच्या आत कोण बसले आहे, त्यांच्याकडे अवैध शस्त्रे आहेत की अमली पदार्थ, हे ओळखणे कठीण होते. नेवासा परिसरात गेल्या काही दिवसांपासून अवैध धंद्यांनी डोके वर काढले असताना, अशा गाड्यांचा वापर गुन्हेगारी कट रचण्यासाठी किंवा छुप्या वाहतुकीसाठी होण्याची दाट शक्यता आहे.

**नियमांची ऐशीतैशी**

वाहतूक नियमांनुसार, वाहनांच्या पुढच्या आणि मागच्या काचेची पारदर्शकता ७०% तर बाजूच्या काचांची ५०% असणे बंधनकारक आहे. मात्र, नेवाशात अनेक राजकीय पदाधिकाऱ्यांच्या नावाखाली आणि भाईगिरी करणाऱ्या तरुणांच्या गाड्यांना १०० टक्के काळी फिल्म लावलेली दिसते. विशेष म्हणजे, भरचौकात पोलीस उभे असतानाही या गाड्यांवर कोणतीही कारवाई होत नाही, हे विशेष.

**नागरिकांचा सवाल: नियम फक्त सामान्यांसाठीच?**

एखाद्या सामान्य दुचाकीस्वाराने हेल्मेट घातले नाही किंवा कागदपत्रे नसतील, तर पोलीस तत्काळ दंड वसूल करतात. मात्र, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या या ब्लॅक फिल्मवाल्या मोठ्या गाड्यांना पोलीस सलाम ठोकून सोडून देतात का? असा खोचक सवाल नागरिक विचारत आहेत.

**अवैध धंद्यांना बळ:**

काळ्या काचांच्या आडून गावठी कट्टे, दारू आणि अमली पदार्थांची तस्करी वाढण्याची शक्यता.अपघातांचे प्रमाण: रात्रीच्या वेळी काळ्या फिल्ममुळे चालकाला स्पष्ट दिसत नसल्याने अपघातांचा धोकाही वाढला आहे. नेवासा पोलीस आता या गाड्यांवर दंडात्मक कारवाई करणार की गुन्हेगारी वाढण्याची वाट पाहणार? जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणी तात्काळ लक्ष देऊन विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## सारसनगरातील दामोदर विधाते विद्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सारसनगर येथील दामोदर विधाते मास्तर विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये महात्मा फुले यांच्या कार्याचा, विचारांचा व समाजप्रबोधनाच्या संदेशाचा जागर करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. नगरसेवक प्रकाश भागानगरे यांच्या हस्ते हा पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक ज्ञानदेव पांडुळे, अभिषेक चिपाडे, अवधूत फुलसौंदर, संस्थेचे सरचिटणीस प्रा. शिवाजीराव विधाते, मयूर विधाते, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शिवाजीराव म्हस्के, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष सुसे तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरसेवक प्रकाश भागानगरे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध लढा देत शिक्षणाची क्रांती घडवून आणली. त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचून समाजाला नवदिशा दिली. आजच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून शिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे. समाजात समानता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

प्रा. शिवाजीराव विधाते म्हणाले की, महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते विचारवंत आणि क्रांतिकारक होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांना उभारी दिली. आजच्या काळात विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकातील शिक्षण न घेता समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा फुले यांच्या जीवनातून घ्यावी.

## ग्रामीण विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हीच खरी समाजसेवा- सीईओ आनंद भंडारी

**ग्रामीण शिक्षणाला नोबल मेडिकल फाउंडेशनचा हातभार; शाळांना डिजिटल साहित्याचे वाटप**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ग्रामीण भागाशी नाळ जोडून शिक्षण क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या नोबल मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटरच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ निमित्त जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांना अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य व डिजिटल बोर्डचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते तसेच राज्याचे आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष पोपट पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की, ‘‘जिल्हा परिषद शाळा या सर्वसामान्य व कष्टकरी वर्गाच्या मुलांचे शिक्षणाचे केंद्र आहेत. नोबल फाउंडेशनसारख्या संस्थांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांना उंच भरारी घेण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली आहे. पैसा किती खर्च झाला यापेक्षा त्यामागची भावना महत्त्वाची असून अशा सामाजिक कार्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेत नक्कीच वाढ होईल.’’ स्पर्धा परीक्षेमध्ये आजही जिल्हा परिषदेचे विद्यार्थी प्रथम क्रमांकावर आहेत समाजात श्रीमंतांची संख्या खूप आहे परंतु पैसा असूनही देण्याची दानत नाही ज्यांची देण्याची दानत आहे तोच खरा समाजसेवक त्यापैकी नोबल फाउंडेशनचे डॉ. बापू कांडेकर आहेत पैसा किती खर्च केला त्यापेक्षा त्या मागची भावना महत्त्वाची आहे नगर जिल्ह्यात ३५३२ जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत या ठिकाणी उत्तम पद्धतीने अध्यापनाचे काम




केले जाते माजी विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचे आम्ही गावागावात आव्हान केले त्याचा परिणाम चांगला दिसून आला आहे त्यामुळे ग्रामीण भागातील गुणोत्तेत वाढ झाली आहे नोबल फाउंडेशन ने जिल्हा परिषद शाळांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करून जो विश्वास दाखवला आहे त्याचा निश्चित फायदा होणार असून गुणवत्ता वाढीवर चांगला परिणाम होईल असे ते म्हणाले.

कार्यक्रमात राज्याचे आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष पोपट पवार यांनी सांगितले की, ‘‘गेल्या दोन दशकांपासून नोबल हॉस्पिटल व फाउंडेशन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत आहे. ‘चला गावाकडे चला’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणत त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण संस्कार जपण्याचे काम केले आहे.’’ नोबल फाउंडेशन च्या माध्यमातून चाललेल्या या कार्याचा आदर्श इतरही सामाजिक संस्थांनी घ्यावा असे ते म्हणाले.

फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. बापूसाहेब कांडेकर यांनी आपल्या मनोगतातून ग्रामीण जीवनाशी असलेली नाळ अधोरेखित केली. ते म्हणाले की, ‘‘नोबल फाउंडेशनची स्थापना २००४ साली झाली असून गेल्या २२ वर्षांपासून आम्ही सामाजिक कार्य सातत्याने करत आहोत. आमचे संपूर्ण शिक्षण खेड्यात झाले आहे. त्या काळात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. कठीण परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून आम्ही शहरात आलो, मात्र ग्रामीण भागातील संघर्ष कधी विसरलो नाही.’’ ‘‘शिक्षण घेताना आम्हाला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आजच्या पिढीला त्या अडचणींना सामोरे जावे लागू नये, हा आमचा उद्देश आहे. म्हणूनच नोबल फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने आणि प्रोत्साहन देण्याचे काम आम्ही करत आहोत. शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ व्हावी आणि विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, यासाठी डिजिटल बोर्डचे वितरण करण्यात आले आहे. ‘‘फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले आहेत. कोरोना काळात गरजूंना मदत, तसेच अनाम प्रेम संस्था, राष्ट्रीय अंधत्व निवारण संस्था यांसारख्या संघटनांना मदत देण्यात आली आहे. एकूण सुमारे २ कोटी ३६ लाख रुपयांची मदत विविध उपक्रमांद्वारे करण्यात आली आहे. आज जिल्ह्यातील १३ शाळांना डिजिटल बोर्ड देताना आम्हाला समाधान वाटत आहे. हे काम समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे,’’ असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास डॉ. संगीता कांडेकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, शिक्षक नेते रमेश रोहोकले, डॉ. दिलीप पवार, डॉ. नानासाहेब अकोलकर, डॉ. सुंदर गोरे, डॉ. विजय पाटील, डॉ. पांडुरंग डौले, उपसभापती रामदास भोर, डॉ. सुनील गंधे, विजय निकम, राहुल हिरे अजित माने ,अभय गायकवाड आदींसह शिक्षक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विजय निकम राहुल हिरे प्रशासकीय अधिकारी विश्वजीत मोरे यांचे कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभलेकार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष मोरे यांनी केले, तर आभार डॉ. नानासाहेब अकोलकर यांनी मानले.

# मनपा पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात

## माऊली सभागृहात रंगला गीत-संगीताचा जल्लोष; कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव । पुढील वर्षी कार्यक्रम महापालिका सभागृहातच - आयुक्त यशवंत डांगे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक महोत्सव माऊली सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हिंदी-मराठी गीतांच्या सादरीकरणातून आपल्या कलागुणांची रंगतदार झलक सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲडव्होकेट धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, सभापती दिपालीताई बारस्कर, नगरसेवक करण कराळे, मोहित पंजाबी, पुष्कर कुलकर्णी, रोहन सानप, सुशांत जाधव, उपायुक्त मेहर लहारे, शहानवाज तडवी, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, शंकर मिसाळ, क्रीडा अधिकारी फिलिप्स आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, महानगरपालिका ही कर्मचाऱ्यांचे हित जपणारी संस्था असून प्रशासनाने सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावला आहे. नगरकरांचे प्रश्न सोडवण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, असे त्यांनी आवाहन केले. तसेच धकाधकीच्या जीवनात आनंदी राहण्यासाठी व कलागुणांना वाव देण्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील वर्षी हा सांस्कृतिक महोत्सव महापालिकेच्या सभागृहातच आयोजित करण्यात येईल, असे सांगताना त्यांनी सभागृहाच्या इंटेरियर कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही केली.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने महापालिकेच्या माध्यमातून या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी हिंदी व मराठी गीतांच्या माध्यमातून आपल्या संस्कृती व परंपरेचे जतन करण्याचे काम केले, असे त्या म्हणाल्या.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सांगितले की, पदाधिकारी नगरकरांना जे आश्वासन देतात ते पूर्ण करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावतात. ते शहराचा मुख्य कणा आहेत. पुढील काळात दिवाळी निमित्त महापौर-उपमहापौर महोत्सवाचेही आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळते. महापालिकेने सुरू केलेला हा सांस्कृतिक महोत्सव कौतुकास्पद असून यामुळे कर्मचारी वर्गात उत्साह निर्माण होतो.

कार्यक्रमादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ''मनाच्या धुंदीत ये ना गं सखे'', ''रामजी की निकली सवारी'', ''अधीर मन झाले'', ''दिल ने दिल को पुकारा'', ''दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे'', ''कहो ना प्यार है'', ''यारा तेरी यारी को'' यांसारख्या मराठी व हिंदी गाण्यांवर बहारदार सादरीकरण करत माऊली सभागृह दणाणून सोडले. प्रेक्षकांनीही या सादरीकरणांचा मनमुराद आनंद घेतला.

विशेष आकर्षण ठरले आयुक्त यशवंत डांगे यांचे 'मनाच्या धुंदीत ये ना गं सखे' या गाण्याचे सादरीकरण. त्यांच्या सुरेल आवाजाने सभागृह मंत्रमुग्ध झाले आणि प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली.

एकूणच या सांस्कृतिक महोत्सवामुळे मनपा कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

---

## भवानी मराठा महिला ग्रुपतर्फे महिलांना निरोगी आरोग्यासाठी तणावमुक्त जीवनशैलीचा कानमंत्र




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** शहरातील स्वास्तीक हॉस्पिटलमध्ये भवानी मराठा महिला ग्रुपच्या वतीने महिला आरोग्य सेमिनाराचे आयोजन करण्यात आले होते. या सेमिनारला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यामध्ये महिलांना निरोगी आरोग्यासाठी तणावमुक्त जीवनशैलीचा कानमंत्र देण्यात आला.

या सेमिनारमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. कल्याणी चौधरी उपस्थित होत्या. त्यांनी स्त्री आरोग्य, महिला प्रजनन आरोग्य तसेच कॅन्सर प्रतिबंध या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता नियमित तपासण्या करून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः स्तन कॅन्सर व गर्भाशयाच्या कॅन्सरच्या लक्षणांविषयी जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी त्यांनी संतुलित आहार, नियमित व्यायाम, मानसिक आरोग्याची काळजी तसेच तणावमुक्त जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या विविध आजारांपासून दूर राहण्यासाठी महिलांनी स्वतःसाठी वेळ देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

सेमिनारदरम्यान उपस्थित महिलांनी विविध आरोग्यविषयक प्रश्न उपस्थित केले. डॉ. चौधरी यांनी सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत उपस्थितांच्या शंकांचे समाधान केले. या कार्यक्रमामुळे महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

---

## हिरडपुरी वाळू घाटावर 'रॉयल्टी'च्या नावाखाली लूट; महसूलाला लाखोंचा फटका

### विना नंबर हायवा धावत; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर-** तालुक्यातील हिरडपुरी येथील शासकीय वाळू घाटावर नियमांचे उल्लंघन करत वाळू उपसा व वाहतूक सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रॉयल्टी न भरताच मोठ्या प्रमाणात वाळूची वाहतूक होत असल्याने शासनाच्या महसूलात लाखो रुपयांचा तोटा होत असल्याचे समोर येत आहे.



ग्रामस्थांच्या माहितीनुसार, घाटावरून विना नंबर असलेली हायवा वाहने सर्रास धावत असून, संबंधित यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. यामुळे कायद्याचे उघड उल्लंघन होत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांकडून वाळू तस्करांना मूक संमती दिली जात असल्याचीही चर्चा गावात रंगली आहे. परिणामी शासकीय ठेकेदारांकडून नियमबाह्य पद्धतीने वाळू उपसा करून वाहतूक केली जात असल्याचा आरोप आहे.

दरम्यान, या प्रकाराची माहिती संबंधित प्रशासनाला असूनही प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

**कारवाईची मागणी**

विना नंबर हायवा वाहनांवर तात्काळ कारवाई करून वाळू उपसा थांबवावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी पाचोड पोलिसांकडे केली आहे.

---

## सालशिद्धबाबा यात्रेसाठी मिडसांगवी सज्ज

### ११ ते १३ एप्रिलदरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार -** साप विंचू काट्याचे देवस्तान म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या आणि पाथर्डी तालुक्यात मढी नंतर सर्वात मोठी भरणारी यात्रा म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या मिडसांगवी येथिल नागदेवता म्हणजे सालशिद बाबाचा यात्रा उत्सव आज सुरू होणार आहे पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथे श्री सालशिद्धबाबा देवस्थान यात्रा मोठ्या उत्साहात साजरी होणार असून दि. ११, १२ व १३ एप्रिल २०२६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेनिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

**या यात्रे मध्ये पुर्वी मोठ्या प्रमाणात पशुहत्या होत असे परंतू राष्टसंत भगवान बाबानी येथिल पशूहत्या बंद केली होती परंतु पुन्हा या यात्रेत पशुहत्या मांस विक्री होत आहे त्यामुळे मिडसांगवी येथे होणाऱ्या श्री सालशिद्धबाबा यात्रेनिमित्त दिनांक १२ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान परिसरात मटण व मांस विक्री पूर्णतः बंद ठेवण्यात यावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले असून यात्रेदरम्यान धार्मिक भावना जपण्यासाठी तसेच गावातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी ही कारवाई करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.**

शनिवार दि. ११ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे हरिकीर्तन होणार आहे. रविवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते १२.३० या वेळेत ह.भ.प. महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच ह.भ.प. महंत हनुमंत महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. यामध्ये कावड यात्रेचे पाणी आणून श्रींना स्नान घालण्यात येणार असून सायंकाळी छबीना मिरवणूक व आकर्षक फटाक्यांची आतषबाजी होणार आहे.

रविवार रात्री ९ ते १२ या वेळेत संगीत मैफिल व रंगारंग कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सोमवार दि. १३ एप्रिल रोजी रात्री लोकनाट्य तमाशाचा बहारदार कार्यक्रम होणार असून दुपारी ४ ते ६ या वेळेत कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात येणार आहे. या यात्रेनिमित्त कुस्त्यांसाठी रोख बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली असून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री सालशिद्धबाबा देवस्थान ट्रस्ट व मिडसांगवी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## समतेचा दीप प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प

### निघोजमध्ये महात्मा फुले जयंती उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर-** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त निघोज येथे आयोजित कार्यक्रम उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी त्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, ''महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी शिक्षणाचे द्वार खुले केले. त्यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश देत परिवर्तनाची क्रांती घडवून आणली. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि समाजात समानतेची भावना रुजवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.'' ते पुढे म्हणाले, ''आजच्या आधुनिक युगातही महात्मा फुले यांचे विचार अत्यंत प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहावे, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.'' तसेच उपस्थित युवकांना उद्देशून त्यांनी सांगितले की, ''महात्मा फुले यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि सामाजिक ऐक्य वाढवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.'' या कार्यक्रमास मळगंगा देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, रमेशशेठ वरखडे, रोहिदासशेठ लामखडे, डीवायएसपी सुभाषजी सोनवणे, पीएसआय दिलीपजी सोनवणे, समता परिषदेचे अध्यक्ष पृथ्वीदादा कोल्हे, सोसायटीचे व्हाईस चेअरमन हिराभाऊ सोनवणे, मातंग समाज चळवळीचे सतीशजी साळवे, सुलतानभाई सय्यद, प्रवीण व्यवहारे, राहुल वाघमारे, राजुशेठ कुदळे, विनायक सोनवणे, शांताराम सोनवणे, दामूशेठ लंके, निलेश रसाळ, अनिल मदगे, अजय सोनवणे आदी मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून, त्यांच्या विचारांवर चालत समाजप्रगतीचा संकल्प अधिक दृढ करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

## (पान १ वरून) पे अँड पार्क योजना राबविणे अव्यवहार्य व नियोजनशून्य!

जातात. पे अँड पार्क मुळे ग्राहकांना पार्किंगसाठी शुल्क द्यावे लागल्याने ग्राहक येण्यास टाळाटाळ करतील, परिणामी व्यवसायात मोठी घट होईल. बाजारपेठ हळूहळू इतर ठिकाणी स्थलांतरित होण्याची शक्यता असून अनेक गरजू कामगारांना नोकरीवरून कमी करावे लागेल.सध्या संपूर्ण देशात व्यवसाय मंदीच्या परिस्थितीत आहे. व्यापाऱ्यांना दैनंदिन खर्च व कर्मचाऱ्यांचे वेतन देणेही कठीण झाले आहे. अशा वेळी ही योजना अधिक आर्थिक ताण निर्माण करणारी आहे. आम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडेही सदर विषयाबाबत हरकत नोंदवून निवेदन दिलेले आहे तसेच महापालिकेकडेही आमचा अधिकृत आक्षेप नोंदवलेला आहे. तथापि, वरील सर्व बाबींचा विचार न करता महानगरपालिका ही अन्यायकारक व बेकायदेशीर पे अँड पार्क योजना जबरदस्तीने राबविण्याचा प्रयत्न करीत असल्यास, आम्हाला नाईलाजास्तव गांधीवादी मार्गाने आंदोलन करावे लागेल. त्यामध्ये एमजी रोडवर दुकाने बंद ठेवून धरणे आंदोलन करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असाही इशारा व्यापारी संघटनेने दिला आहे.

निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष श्याम देडगावकर, सचिव किरण होरा, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर बोरा, तसेच संभव काठेड, विशाख वैद्य, कमलेश आहुजा, रुपेश नहाटा, राहुल मुथा, भागचंद रायसिंगानी, प्रकाश बायड यांच्या सह्या आहेत.

## शहरातील दोन टोळ्यांवर कलम १११ ची कारवाई

टोळी प्रमुख अमोल बाळू पाडळे व टोळीतील साथीदार हे जामीनावर सुटल्यावर प्रचलित कायदयानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील गुन्हे करणे चालू राहिल्याने त्यावरही बीएनएस कलम २०२३ चे कलम १११ हे वाढीव कलम लावण्यात आले आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे,कोतवालीचे निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखान्याचे निरीक्षक जगदीश भांबळ, पोसई प्रविण पाटील पोसई योगेश चाहेर, मपोहेकॉ रोहिणी दरंदले, पोकॉ सतीश त्रिभुवन, पोकॉ हेमंत झिने, मपोकॉ शीला ढेरे यांनी केली.

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

माळीवाडा येथे लवकरच महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार असून त्या माध्यमातून नगरकरांना प्रेरणा मिळत राहील. संत-महापुरुषांच्या विचारांतून समाजाला चांगल्या कार्याची प्रेरणा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास प्रा. माणिकराव विधाते, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, नगरसेवक सुरेश बनसोडे, दत्ता गाडळकर, नगरसेविका सुजाता पडोळे, रेणुका पुंड, ओबीसी सेलचे नितीन घोडके, फुले ब्रिगेडचे किरण जावळे, किरण मेहेत्रे, संकेत लांडे, अवधूत फुलसौंदर, ब्रिजेश ताठे, सुरत शिंदे, योगेश एरंडे, रोहित पठारे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा जयघोष करत त्यांना अभिवादन करण्यात आले.

## विधानपरिषद सभापती मा. प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकाराने कर्जत-जामखेड मध्ये डिजिटल शैक्षणिक क्रांती

शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकारी व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत. या अभियानामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण असून दृक-श्राव्य माध्यमातून अत्याधुनिक, रंजक व सुलभ शिक्षण पध्दती उपलब्ध होत आहे. शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात वाढ होईल आणि विद्यार्थ्यांचा शैक्षिणिक सहभाग, आत्मविश्वास वाढण्यास हातभार लागेल. आधुनिक शिक्षणाच्या संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही प्राप्त होत असल्याने ग्रामीण आणि शहरी अशी दरी कमी होऊन स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त होईल. आजच्या या सोहळ्यात शैक्षणिक संच प्राप्त झालेल्या १४० शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिक सहभागी होत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक परिवर्तन घडविणारा हा उपक्रम धडाडीने राबवित असलेले विधानपरिषद सभापती मा. प्रा. राम शिंदे यांचे त्याबद्दल अभिनंदन केले जात आहे.

## फुलेंच्या स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे - किरण काळे

सावित्रीमाईची मिळालेली साथ अत्यंत महत्त्वपूर्ण होती. फातिमा शेख यांचा देखील या चळवळीतील सहभाग हा अत्यंत मोलाचा आहे. अशोक खरातची भोंदूगिरी संतापजनक : किरण काळे पुढे म्हणाले, शिव, शाहू, आंबेडकर, फुलेंच्या महाराष्ट्रात अशोक खरात सारख्या भोंदूंची भोंदूगिरी आजही समाजाचे भक्षण करते ही अत्यंत संतापजनक बाब आहे. समाजाने, विशेषत: माता-भगिनींनी अशा भोंदू बाबांच्या विळख्याला बळी पडू नये. क्रांतीज्योती सावित्रीमाई, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी, झाशीची राणी यांची प्रेरणा सोबत कायम ठेवली पाहिजे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करणाऱ्या नरेंद्र दाभोळकरांची उणीव या प्रकरणा नंतर महाराष्ट्राला जाणवते आहे. फुले जयंतीच्या निमित्ताने मी आवाहन करतो की, भोंदूगिरीला बळी न पडता शिक्षणाची कास धरून समाजाने पुढे जायला हवे.